
नौशादः एक सुरीली साठवण



मागील दिवसांत संगीतसम्राट या नावाने ओळखले जाणारे महान संगीतकार, संगीतज्ज्ञ नौशाद अली यांची भेट झाली. त्यांच्याबरोबर बऱ्याचशा मुद्यांवर बोलणे झाले तेव्हा हे जाणून आश्चर्य वाटले की, नव्वदी ओलांडलेल्या या महान संगीतकाराकडे जाणून घेण्यासारख्या खूप साऱ्या गोष्टी आहेत. संगीताची ही ठेव त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभवांमुळेच तर प्राप्त केली आहे.

☐ शब्दांकनः विजय अकेला

प्रस्तुत आहे त्यांच्याबरोबरच्या गोड गप्पाः-

'न पूछिए कहाँ-कहाँ खुदा का घर बना दिया
जहाँ वो याद आ गया वहीं पे सर झुका दिया'

— नौशाद अली

माझ्या संगीत दिग्दर्शनाखाली मोहम्मद रफीने खूप गाणी गायली आणि तलत महमूदनेसुद्धा! मुकेशने, मन्ना डे आणि महेंद्र कपूरनेसुद्धा गाणी गायलीत. पण एक गोष्ट खरी आहे की, किशोरदासाठी मला कधी संधीच मिळाली नाही. तुम्ही असं मुळीच समजू नका की, तो काही हातमिळवणी किंवा पूर्वनियोजित कार्यक्रम होता. बघा, मी तुम्हाला काही अनुभव सांगतो की, इथे कशा परिस्थितीतून जावे लागते.

किशोरकुमारला सर्वांप्रमाणे मीसुद्धा एक कमालीचा गायक मानतो आणि हे स्वीकारायला मला जरासुद्धा संकोच वाटत नाही. माझ्या कमनशिबामुळे माझ्या वाट्याला त्याला संगीतसूर द्यायची संधीच आली नाही. त्यांच्या गळ्याच्या लायकीचे असे गाणे कदाचित माझ्या जवळ नव्हते. बरं तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगतो की, त्यावेळेपर्यंत खास-खास टीम बनल्या होत्या. अमका हिरो किंवा हिरॉईन म्हणत की, माझ्यासाठी अमूक एकाचाच आवाज घ्या आणि एक संगीतकार म्हणून आम्हाला त्यांचे म्हणणे बऱ्याचदा मान्य करावे लागत असे. सगळं काही आमच्याच हातात नव्हे असे असते. *पालकी* चित्रपटाविषयी एक आठवण सांगतो, मी तलत महमूदकडून एक गाणे रेकॉर्ड करून घेतले आणि ते गाणे चित्रितसुद्धा करण्यात आले.


'कल रात जिंदगी से मुलाकात हो गयी,

चित्रीकरणानंतर काही दिवसांनी निर्माता सैनी यांचे निधन झाले. आणि त्यांच्या जागी महेश कौल आले. दुसरी टीम तयार झाली. बरं, जेव्हा पूर्ण चित्रपट तयार झाला तेव्हा मला सांगण्यात आलं की, हे गाणं आता तुम्ही मोहम्मद रफीकडून गाऊन घ्या. कारण माझ्या चित्रपटाच्या नायकाचा असा हट्ट आहे. मी पुन्हा सगळा खर्च करण्यास तयार आहे आणि हिरोला नाराज करणे मला परवडणार नाही.

तेव्हा जबरदस्तीने ते गाणे रफींच्या आवाजात रेकॉर्ड करून घेतले आणि तलत महमूद माझ्यावर नाराज झाले. त्यांना अशी सल होती की, हे सर्व मी जाणूनबुजून करवून घेतले. आदमी चित्रपटाच्या वेळीही काहीसे असेच माझ्या बाबतीत घडले. त्या चित्रपटात एक गाणे होते–

'कैसी हसीन आज बहारों की रात है,

हे गाणे तलत महमूद आणि मोहम्मद रफी या दोघांनी गायले होते. पण चित्रपटाचा हिरो मनोजकुमारने निर्मात्याकडे हट्ट धरला की, माझा आवाज महेंद्र कपूरच्या आवाजाशी मिळताजुळता आहे. तेव्हा मला पुन्हा तलत महमूदचा आवाज बदलावा लागला.



पण या अशा वेळी मी अगदी गप्प राहिलो असेसुद्धा नव्हते. मी म्हटलं की, तुम्ही नवीन आवाजासाठी दरवाजे बंद करता आहात. खूप असे नवीन लोक आहेत की, ज्यांचा आवाज मधुर आहे. त्यांना संधी द्या. ज्यांनी काल आईसाठी प्ले-बॅक केले ते आज मुलीसाठी प्ले-बॅक करतायत आणि तेच उद्या नातीसाठीसुद्धा प्ले-बॅक करण्याची इच्छा ठेवून आहेत. जे बापासाठी कधी काळी गात होते तेच आता मुलासाठीसुद्धा गाताहेत. तर अशा परिस्थितीत दिवे विझतील आणि अंधार होईल. आणि तसे झालेसुद्धा! मोहम्मद रफी गेले, कोणी दुसरा रफी आला नाही. तलत गेले कुणी दुसरा तलत झाला नाही. किशोरकुमार गेला आणि दुसरा किशोरकुमारसुद्धा झाला नाही.

एकामुळे एकाचा उत्कर्ष होवो अशीच इच्छा आहे. तसं पाहायला गेलं तर प्रत्येक व्यक्ती ही जाण्यासाठीच येते.

'ठोकरे खाइए पत्थर भी हटाते चलिए,आनेवालों के लिए राह बनाते चलिए,दिल में सोये हुए नगमों को जगाना है अगर,मेरी आवाज में आवाज मिलाते चलिए'

मला अस वाटतं की, वर्तमानपत्र असो की रेडिओ किंवा टीव्ही, सर्व माध्यमाद्वारे भारतीय संगीताविषयी बोला आणि त्याला लुप्त होण्यापासून वाचवा. तुम्हाला तुमच्या संगीताचे शिक्षण घेतले पाहिजे आणि आपल्या मुलांसाठी भारतीय संगीत अबाधित राखले पाहिजे. आज जे चारी बाजूंनी आपल्याकडे पॉप संगीत येते आहे, ते संगीत आपले नाहीय. अरे! आपणच आपल्या निरोगी, सशक्त मुलांच्या नसांमध्ये वाईट रक्त का भिनवायचे? आणि जर आपण सगळ्या लोकांनी मिळून आवाज उठवला तर निश्चितच हे वातावरण बदलेल. जेव्हा मागच्या काही दिवसात 'इन्फर्मेशन अॅण्ड ब्रॉडकास्टिंग मिनिस्टरी'मध्ये आमचे बोलणे झाले तेव्हा त्यांनीसुद्धा सांगितले की, असा आवाज प्रथम जनतेतून आला पाहिजे. कारण जेव्हा कधी आम्ही चित्रपट निर्मात्याबरोबर या विषयावरून बातचीत करतो त्यावेळेस त्यांचे असे म्हणणे असते की, आम्ही असं संगीत देतो, कारण लोकांनाच ते आवडते आहे. तेव्हा आता अशी वेळ येऊन ठेपलीय की, आपल्याला खोटं बोलणाऱ्यांची तोंडे काळी करायची आहेत. बघा, जुन्या वाटांवरूनच आपण नव्या वाटा तयार करतो. जे संगीत आमच्या पूर्वजांचे होते, ज्याची प्रशंसा थोरामोठ्यांकडून केली गेली, आपल्या मातीत जन्माला आलेल्या या संगीतामध्ये बदल करून आपण त्यांचा अनादर करता कामा नये. भले जमाना कितीही नवीन असू दे. ज्याप्रमाणे आपण आपले पिढीजात नाव बदलत नाही त्याचप्रमाणे आपण संगीताच्या बाबतीतसुद्धा हेच धोरण ठेवले पाहिजे. आपले संगीत अतिशय पवित्र आहे आणि भगवान शंकराची रचना आहे. आपले संगीत अतिशय पूजनीय आहे. आपण याला व्यापारी दृष्टिकोनातून पाहू नये. आपणच आपल्या संगीताचे रक्षण केले पाहिजे. नव्या पिढीचे असे म्हणणे आहे की, नव्या तंत्रज्ञानामुळे मनात असूनसुद्धा नव्या संगीताकडे आम्ही पाठ फिरवू शकत नाही. पण असे व्हायला पाहिजे होते की, नव्या तंत्रज्ञानातच अशा काही गोष्टी घालायला हव्यात की आपले जुने संगीत आणखी चांगल्याप्रकारे सुरक्षित राहिले पाहिजे. त्यांचा मान आणखी वाढला पाहिजे. ते संगीत आपल्याला जास्त मधुर वाटले पाहिजे.

मला खरोखर वाईट वाटतेय की, आज आपण आपल्याच देखण्या वाद्यांपासून रोज दूर चाललोय. खरोखर तो दिवस दूर नाही, ज्यावेळेस ही सारी वाद्ये तुम्हाला संग्रहालयात ठेवलेली दिसतील. मला वाईट वाटतेय, मी तुम्हा सर्वांना फक्त विनंती करू शकतो आणि काहीच नाही.

आश्चर्याची गोष्ट आहे की, आपल्या सगळ्या हिंदुस्थानात सुंदर आणि पूजनीय वाद्ये आहेत. जसे सरोद, सारंगी, रसराज, ताशा, नगारा, ढोल (राजस्थानी व बंगाली) आता कुठेच ऐकू येत नाही. जेव्हापासून अमेरिकेचे सिंथेसाइजर आले आहे तेव्हापासून त्यातूनच ते म्युझिक काढून घेतात आणि जे आमचे शिष्य आपल्या मेहनतीने आपल्या गुरूच्या आशीर्वादाने आणि मेहनतीने १०-२० वर्षात काही शिकतात ते तोंड बघत राहतात.

पखवाज तबला आणि तबला तरंग तर आता कुठल्याच संगीतात ऐकायला मिळत नाही. सांगा, कसा हा भीषण काळ आहे, की ज्यावेळेस मोठे-मोठे उस्ताद आपल्या शिष्यांना आणि आपल्या मुलांना सांगताहेत की, आता ही सारी वाद्ये शिकू नका. गिटार आणि व्हायोलिन वाजवायलाच शिका. नाहीतर तुम्हाला दोन वेळचे जेवायला कोण देईल? तेव्हा जे गरीब आहेत ते म्युझिकच्या जागी शिंप्याचे आणि लोहाराचे काम करताहेत; तर बाकी साईड ड्रम, इफोनियम, कॉसेट वगैरे वाजवताहेत. उद्या आपल्याला संग्रहालयात हिंदुस्थानी वाद्ये दाखवायला लागतील.

आपल्याला परत आपली ओळख करून घेण्यासाठी आपल्या पारंपारिक वाद्याकडे परत यायला पाहिजे आणि ही गोष्ट तुम्ही आपल्या वर्तमानपत्राच्या माध्यमातून वाचकांपर्यंत जरूर पोहोचवा. ●